# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक:31.05.2024** **वार :शुक्रवार**

---

**पुणे लोकसभा**

पुण्यातल्या चारही लोकसभा मतदारसंघांच्या मतमोजणीची प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. चार जून रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास सर्व चारही मतदारसंघांचे निकाल जाहीर होतील अशी आशा जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केली.

**कल्याणी नगर**

कल्याणीनगर कार अपघात प्रकरणी सुरेंद्र अगरवाल आणि विशाल अगरवाल यांना 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी न्यायालयानं सुनावली आहे. आज या दोघांची पोलिस कोठडीची मुदत संपल्यानं त्यांना न्यायालयात हजर कऱण्यात आलं होतं.

**ससून रक्त नमुने**

कल्याणीनगर कार अपघात प्रकऱणी अल्पवयीन आरोपीच्या रक्त नमुन्यांची अदलाबदल करण्यासाठी ससून रुग्णालयात एक महिला आणि दोन वयस्क व्यक्तींचे नमुने घेण्यात आल्याचं वैद्यकीय शिक्षण विभागाच्या चौकशी समितीच्या अहवालात म्हटल्याचं हिंदुस्थान समाचारनं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे. याप्रकरणी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर यल्लाप्पा जाधव यांच्यावरही समितीनं ठपका ठेवला आहे. समितीनं राज्य सरकारला त्यांचा चौकशी अहवाल सादर केला आहे.

**म्हस्के ससून**

बी. जे वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या अधिष्ठातापदाचा अतिरिक्त कार्यभार डॉक्टर चंद्रकांत म्हस्के यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. डॉक्टर म्हस्के बारामतीतल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सरकारी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता म्हणून कार्यरत आहेत. ससूनचे माजी अधिष्ठाता डॉक्टर विनायक काळे यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आल्यानंतर म्हस्के यांच्याकडे काल हा कार्यभार सोपवण्यात आला.

**आरोग्य प्रमुख**

महापालिकेच्या आरोग्य प्रमुख पदाचा अतिरिक्त पदभार डॉक्टर कल्पना बळीवंत यांच्याकडे देण्यात आला आहे. पालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. पुणे महापालिकेचे आरोग्यप्रमुख डॉक्टर भगवान पवार यांना नुकतंच राज्यसरकारनं निलंबित केलं आहे.

**युवक काँग्रेस पवार**

दरम्यान, डॉक्टर पवार याचं निलंबन मागे घ्यावे अशी मागणी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रोहन सुरवसे यांनी केली आहे. ही कारवाई सुडबुद्धीनं केल्याचं डॉक्टर पवार यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. त्या पार्श्वभुमीवर सुरवसे यांनी डॉक्टर पवार यांचं निलंबन मागणे घेण्याची मागणी केली आहे.

**होळकर जयंती**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची आज 299 वी जयंती आहे. त्यानिमित्त सावित्रीबाई फुले विद्यापीठात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आलं. यावेळी कुलगुरू, प्रकुलगुरू, प्रभारी कुलसचिव उपस्थित होते. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राच्या वतीनं अहिल्याबाईंवरील एका इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आलं. तर पुणे महापालिकेतही अहिल्याबाईंच्या छायाचित्रास महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. पिंपरी चिंचवड मध्ये पिंपरी इथल्या मुख्य प्रशासकीय भवनातील अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस तसेच मोरवाडी पिंपरी आणि सांगवी येथील पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

**तंबाखू**

तंबाखूचा समावेश अमली पदार्थामध्ये करावा आणि त्याच्या उत्पादनावर बंदी घालण्याची मागणी सर्वजीव मंगल प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. कल्याण गंगवाल यांनी पत्राद्वारे आज केली. 31 मे हा तंबाखूविरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. या पार्श्वभुमीवर गंगवाल यांनी सरकारकडे पत्राद्वारे ही मागणी केली आहे.

**म्हाडा सोडत**

म्हाडाच्या पुणे विभागाने 4877 घरांसाठी सोडतीसाठी अर्ज करण्यास पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. नागरिकांना 6 जून पर्यंत सोडतीसाठी अर्ज करता येतील. निवडणुकीच्या जबाबदाऱ्यांमुळे शासकीय कर्मचाऱ्यांची कागदपत्रे विलंबाने मिळत असल्यानं हा बदल करण्यात आला आहे. अर्जासाठी ही अंतिम मुदतवाढ असल्याचं म्हाडाचे मुख्य अधिकारी अशोक पाटील यांनी सांगितलं.

**शेड कारवाई**

पुणे शहरातल्या अनेक भागात हॉटेल, रेस्टॉरंट, बारच्या अनधिकृत बांधकामांवर स्थानिक प्रशासनाकडून कारवाई सुरू आहे. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर तात्पुरत्या उभारलेल्या शेडवर देखील ही कारवाई केली असल्यानं हॉटेलचालक धास्तावले आहेत.

**पुणे रहदारी**

पुण्यातल्या रहदारीला कंटाळून हिंजवडी आयटी पार्कमधून 37 कंपन्या पुण्यातून राज्याबाहेर गेल्या आहेत. त्यामुळे पोलिस आणि महापालिकेनं या भागातल्या वाहतूक कोंडीवर युद्धपातळीवर उपाययोजना करण्याची मागणी आमदार रवींद्र धंगेकर यांनी केली आहे. अजूनही काही कंपन्या पुण्याबाहेर स्थलांतरीत होण्याचा विचार करत असल्याचं धंगेकर म्हणाले.

**जिल्हा टेबल टेनिस**

पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने पुण्यात टेबल टेनिस स्पर्धा सुरु आहेत. त्यामध्ये पंधरा वर्षाखालील गटात अग्रमानांकित शौरेन सोमण याच्यासह निषाद लेले, नील नवरे आणि श्रेयस माणकेश्वर यांनी उपांत्य फेरीत स्थान मिळविले. मुलींमध्ये अग्रमानांकित सई कुलकर्णी तसेच तृतीय मानांकित पलक जेसवानी यांनी उपांत्य फेरीकडे आगेकूच केली.

**हवामान**

पुण्यात आज सकाळपासून आकाश निरभ्र राहिलं. पुणे आणि परिसरात कमाल तापमान 37 अंश तर किमान तापमान 24 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअस नोंद हवामान विभागानं केली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**